# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – २१ नोव्हेंबर २०१५

## विद्यार्थी कल्याण विभाग मुंबई विद्यापीठ आता नाट्यनिर्मितीतही

### (महेश एलकुंचवारांचे ' सोनाटा' नाटक रंगमंचावर)

मुंबई - विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी अग्रेसर असलेला मुंबई विद्यापीठाचा विद्यार्थी कल्याण विभाग महेश एलकुंचवारांचे ' सोनाटा' हे नाटक रंगमंचावर आणत आहे.

'सोनाटा' या नाटकात मुंबई शहरातील समवयस्क, प्रौढ, अविवाहित, भिन्न भाषिक, भिन्न प्रदेशातील, भिन्न वृत्तीच्या पण एकत्र राहणार्या मैत्रिणींचे ताणेबाणे आहेतसंवाद आणि विरामांमध्ये "नाटक" या साहित्यकृतीचे मर्म असते याचे पुरेपूर भान एलकुंचवारांच्या याही नाटकात दिसते.' सोनाटा' या शीर्षकातही उपरोधिक प्रतीकात्मता आहे.' सोनाटा' हा बिथोविन या पाश्चात्य संगीतकाराने निर्माण केलेला पियानोवरील स्वरांचा सुरेख मेळ आहे. या स्वरमेळात तीन स्वर वेगळे असूनही त्यांच्यात सुमेळ साधला जातो. जो सुमधूर असतो तेवढाच करूण असतो.'सोनाटा' नाटकातील तीन स्त्रियांची जीवनरीत अशी भिन्न प्रकारची आहे आणि तरीही त्या एकत्र येतात तेव्हा एक सुमेळ (harmony) तयार होतो... एकूणच नाटक पहाण्यात मजा आहे कारण राजेंद्र बडे यांचे उत्तम दिग्दर्शन आणि कलाकारांचा नेटका अभिनय.

"मुंबई विद्यापीठाचे माजी कलाकार विद्यार्थींचे विद्यार्थी कल्याण विभागाबद्दल असलेले ममत्व, त्यांनी पुढाकार घेऊन विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमातील निवडलेले नाटक व अत्यंत व्यावसायिक पद्धतीने सादर करत असलेल्या संचाबाबत मला आनंद आहे" असे उद्गार मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय देशमुख यांनी काढले. डॉ. मृदुल निळे, माजी संचालक विद्यार्थी कल्याण विभाग आणि सध्याच्या संचालिका डॉ. मनाली लोंढे यांचा पाठिंबा घेऊन ही टीम सज्ज झाली आहे शुभारंभाच्या प्रयोगासाठी. शिवाजी मंदिर, दादर येथे खास निमंत्रितांसाठी व नाट्यप्रेमींकरिता दि. 24 नोव्हेंबर रोजी होणार आहे. रसिकांनी याचा जरूर लाभ घ्यावा असे आवाहन विद्यार्थी कल्याण विभागाच्या संचालक डॉ. मनाली लोंढे यांनी केले आहे

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)